# आधुनिक भारताच्या विकासाचे दिपस्तंभ -डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**प्रा.टी.जी.हापसे**
संशोधक विद्यार्थी
स्वा.रा.ति.म.वि.नांदेड

**प्रा.डॉ. शिवाजी एस. पवार**
एम.ए., पि.एच.डी.
संशोधक मार्गदर्शक
दिगंबरराव बिंदु महाविद्यालय,भोकर जि. नांदेड

**प्रस्तावना,**

१९३५ च्या कायद्यानुसार भारताच्या आर्थीक विकासाच्या प्रक्रियेला पर्यायाने आधुनिक भारत निर्माण करण्यासाठी विविध तज्ञ व्यंक्तीनी मोलाचे योगदान दिले. हया भारताच्या दृष्टिने अंत्यत संवेदनशिल व महत्वाच्या कालावधीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय झाला. विविध बाबीच्या संदर्भात जर विचार केला तर बाबासाहेबांच्य समकालीन विचारवंताच्या तुलनेत ते एक प्रभावी अर्थतज्ञ ,प्रवक्ते, सामाजीक क्रांतीकारक म्हणुन त्यांचा लौकीक होता. बाबासाहेबांनी त्यांच्या जवळपास ४० वर्षाच्या एकंदरीत सामाजीक,राजकिय,शैक्षणिक कारकिर्दीमध्ये आधुनिक भारताच्या विकासामध्ये मोलाची भर घातली. नव्हे भारतांच्या विकासाची पायाभरणीच बाबासाहेबांनी केली असे म्हणणे अतिशोक्ती ठरणार नाही. १९२० ते १९५० हया त्यांच्या एकंदरीत कारकिंर्दीमध्ये त्यांनी भारताच्या विविध राष्ट्रीय पैलुवर स्वतःच्या बुध्दीचातुर्याने मार्गदर्शनक असे भाष्य केल्याचे दिसुन येते. बाबासाहेबांचे अत्यंत महत्वाचे योगदान म्हणजे त्यांनी १९३९ पासूनच भारतीय आर्थीक व राजकिय चौकट मजबुत करण्याचे महत्वाचे असे कार्य त्यांनी केले त्याचप्रमाणे भारतामधील अल्पसंख्याकाच्या च्या समस्या, पाकिस्तानचा विषय, राज्यांचे पुर्नसंघटन हिंदुच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेत सुधारणा समाजविषयक धोरण श्रमधोरण, इ. महत्वाच्या विषयावर बाबासाहेबांचे योगदान अत्यंत महत्वाचे आणि मोलाचे आहे. १९४२ तें १९४७ या कालावधीमध्ये श्रम व जल आणि उर्जा खात्याची कॅबिनेट सदस्य म्हणुन त्यांनी जेव्हा कार्यभार हाती घेतला तेव्हा त्यांनी या पदावर असतांना आर्थीक नियोजन,जल आणि विद्युत साधनसामग्रीच्या विकासासाठी अत्यंत मोलाचे असे योगदान दिले. त्यांचे हे कार्य ऐतिहासिकदृष्टया काहीसे दुर्लक्षीत राहिले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नियोजन व जलधोरण-१९४२ ते १९४६ :-**

१९३९ ते १९४५ दरम्यानविध्वंसकारी असे दुसरे जागतिक महायुध्द लढल्या गेले. या महायुध्दाच्या समाप्तीनंतर संपुर्ण युरोप व आशीयाई देशांमध्ये विध्वसीत झालेल्या विविध अद्योगधदे व सेवासुविधा यांच्या पुनरचनेची समस्या निर्माण झाली होती. भारत सुध्दा दुसऱ्या महायुध्दाच्या कालावधी मध्ये ब्रिटीशांच्या बाजुने सहभागी होता. म्हणुन या कालावधीमध्ये ब्रिटीशांनी भारतामध्ये सुध्दा हि योजना कार्यान्वीत केली हि योजना १९४२-४६ या कालावधीमध्ये कार्याबीत केली या योजनेअंतर्गत भारताची दिर्घकालीन अशी आर्थीक विकासाची योजना तयार केली गेली.

पुनरचना आणि आर्थीक विकास योजनेमध्ये सर्वसमावेशकता आणि आर्थीक सुंतुगतपणा आणण्यासाठी सरकारने धोरण व कृतीयोजना ठरविण्यासाठी तिन समित्यांची स्थापना केली. शिखर समिती म्हणुन पुनरचना समिती परिषद (Re Cousistration Coummitee Of The Council ) स्थापना हि समिती आर.सि.सि.या नावने प्रसिध्दीस आणि ती लागु करण्याचे कार्य या समितीचे होते. व्हॉईसरॉय त्यांचे संचालक आणि त्यांच्या सभासदामध्ये सर्व केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सदस्यांचा हयात अंतर्भाव होता प्रत्येक समितीकडे धोरण समिती होती त्यांचे मुख्यधिकारी हे परिषदेच्या सभासदापैकी आणि केंद्रीय प्रातिय राज्यसरकारचे प्रतिनीधी आणि काही व्यापार उद्योग आणि वाणिज्य संबधीत प्रतिनीधी मिळुन रचना होती.

सप्टेबर १९४४ च्या मिटीगमध्ये भारतसरकारच्या विविध मंत्र्याचे मत विचारात घेऊन आराखडा तयार करण्यात आला.

या पुनरंचना आणि विकास योजनेचा हेतु दुहेरी होता. १) संपुर्ण भारतीयांचे राहणीमान उंचावणे आणि सर्वांना खात्रीपुर्वक रोजगार देणे आणि २) उत्पादीत संपत्तीची विभागणी अधिक समानतेने खात्रीने करणे या शिवाय लोकांचे राहणीमान सुधारणे त्या अनुशंगाने श्रमिकांची उत्पादकता सुधारणे आणि त्याचवेळी शेती हा भारताचा प्राथमिक उद्योग होता आणि भविष्यात असणार होता. परंतु अर्थव्यवस्थेतील सद्यःस्थितील असमतोल दुरस्त करण्यासाठी देशातील उद्योगाचा सर्वांबगण विकास महत्वाचा आहे. म्हणुन शेती आणि उद्योग या दोन्हीचा विकास एकाच वेळी करणे नियोजनाच्या दृष्टीने गरजेचे आहे. हे मान्य केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विकासाच्या या महत्वपुर्ण अंगाच्या दृष्टीकोणाचे सर्वेक्षण केले होते ते केंद्रीय मंत्रीमंडळाचे सदस्य होते आर.सी.सी. सदस्य होते सिचंना आणि शक्तीच्या धोरणसाठी अध्यक्ष होते. आणि या शिवाय कार्यालयीन समिती सबंधीत होते. धोरण समिती आणि त्यांच्या कार्यालय समितीचे महत्वाचे काम म्हणजे जलसिंचन आणि जलविद्युत शक्तिच्या विकासाशी सबंधीत समस्यांचा अभ्यास करणे आणि त्या समस्याची उकल करण्यासाठी अथवा त्या सोडविण्यासाठी त्यांना दिगादर्शक दिशा सुचविणे या तिनही समित्यावरील आंबेडकरांच्या प्रभावाचा विचार करता भारतातील पर्याप्त जल आणि शक्ती साधनांच्या विकासाठी आवश्यक धोरण आणि कृतियोजनेते आंबेडकरांची मदत महत्वपुर्ण होती. सतत अभ्यास व चर्चा करुन श्रमविभागाने प्रथमच नविन जल व विद्युत धोरणाचा आराखडा तयार केला. त्यामध्ये
अ) सिंचन व जलमार्ग ब) विद्युत शक्तिचा विकास आणि क) अंतर्गत जलवाहतुक इ-धोरणाचा समावेश होता.

**केंदीय जल आणि उर्जा आयोगाच्या दृष्टीने बाबासाहेबांचे कार्य :-**

देशातील विविध प्रांतिकसरकारांशी चर्चा करुन ८ नोव्हे. १९४४ रोजी केंद्रीय तांत्रीक उर्जा मंडळाची स्थापना करण्यात आली होती व नंतरच्या काळामध्ये केंद्रीय उर्जा प्राधिकरणाची जन्मच या १९४४ च्या केंद्रीय उर्जा मंडळातून झ ाली होती. व त्यांनतर २१ एप्रिल १९५१ रोजी केंद्रीय विज आयोग व केंदीय जलउर्जा सिंचन व जलवाहतुक आयोग यांचे एकत्रिकरण करुन केंद्रीय जल आणि उर्जा आयोग स्थापन करण्यात आल्यानंतर केंद्रीय जल व उर्जा आयोग हा त्यांचा घटक बनली पुन्हा १९७४ मध्ये या मंत्रालयाचे विभाजन झाले आणि सिंचन विभाग शेती आणि सिंचन मंत्रालयाचा घटक झाला तर उर्जा हा उर्जा मंत्रालयाचा घटक झाला केंद्रीय जल आणि उर्जा आयोगाचेही विभाजन करण्यात आले. त्याच्या उर्जा विभागाचे नामकरण " केंद्रीय विद्युत प्रधिकरण " झाले तर जल विभागाचे नामकरण "केंद्रीय जल आयोग" असे झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कुशल नेतृत्वामध्ये भारताच्या भावी विद्युत विषयक धोरणाचा पाया त्यांच्या श्रममंत्रालयाच्या माध्यमातुन घातला तर या विद्युत विषयी धोरणामध्ये त्यांनी विद्युत उत्पादनानंतर त्यांचे भारताच्या विविध प्रांतामध्ये निर्माण होणाऱ्या विजेची वितरण व्यवस्था प्रत्येक प्रांतामध्ये कशा प्रकारे ठरवायची याचे सुध्दा धोरण ठरवुन दिले. यासाठी बाबासाहेबांनी इंग्लडची ग्रीडपध्दत आधारभूत ठरविली. निर्माण झालेली विज ही उत्पादकांना व ग्राहकांना कमीत-कमी दरात व कार्यक्षमपणे मिळाली पाहीजे असे त्यांचे धोरण होते यासाठी त्यांनी केंद्रीय विज मंडळामार्फत त्रीसुत्री पध्दतीच्या धोरणाचा अवलंब करावा असु सुचविले होते. या त्रीसुत्री धोरणामध्ये त्यांनी पुढिल बाबीचा समावेश केला होता.

१) विजपुरवठा हा सार्वजनिक उपक्रम म्हणुन सुरु करणे व ज्या प्रदेशामध्ये मोठया प्रमाणात उद्योग आहेत अशा ठिकाणी मोठी उर्जा निर्मीती केंद्र स्थापना करणे.

२) मुख्य पारेषन व्यवस्था अश्या रितीने विकशीत करावी की, मुख्य पारेषन व्यवस्थेला केंद्र माणुन अन्य उर्जा केंद्रे विकसीत होतील.

४) उर्जायंत्रणे बाबत ग्रीड अंतर्गत मागणिचे वारंवार प्रमाणीकरण करण्याचा प्रयत्न त्या-त्या प्रदेशामध्ये व्हावा.

अशा प्रकारे प्रादेशिक विकासासाठी हि ग्रीड पध्दत स्वीकारल्यास देशामधील प्रत्येक नागरिकांस स्वस्त विज घरापर्यंत पोहचविणे शक्य होईल असा त्यांच्या विश्वास होता. बाबासाहेबांच्या विद्युत विषयक धोरण जर कार्यक्षमपणे राबविले असते तर, सद्या जी विद्युत विषयक समस्या निर्माण झाली आहे, ती निर्माण झाली नसती.

**नद्याच्या जलवितरण व्यवस्थेबाबत डॉ. आंबेडकरांची भूमिका :-**

बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातुन भारतातील नदयांचा पाणीवापराबाबत व वितरणाबाबत मार्गदर्शक अशी भूमिका बजाविली आहे. १ नोव्हे.१९४९ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संसद सभाग्रहामध्ये ७४ व्या नोंदीमध्ये दुरुस्ती सुचविली त्याचबरोबर घटना मसुद्यातील कलम २३९ ते २४२ यामध्ये त्यांनी १ सप्टें १९४९ रोजी सुधारणा सुचविली आणि २४२ अ हे कलम समाविष्ट केले ते कलम आंतरराज्य नदया किंवा खोरे यांच्या वाद निवारणा संदर्भात लवाद नेमण्याबाबतचे होते. विविध राज्यांराज्यांमध्ये वाहणाऱ्या नद्यांचे पाणि वापरण्यासंबंधाने भविष्यमध्ये दोन राज्यांमध्ये वादविवाद होऊ नये म्हणुन बाबासाहेबांनी अशा प्रकारच्या लवाद निर्मीतीची तरतुद संविधानाच्या माध्यमातुन करुन ठेवली आहे. त्यामुळे पाणि हे सिंचनासाठी व मानवी जिवनासाठी अत्यंत आवश्यक अशी बाब आहे. व यावरुन वाद होऊ नये म्हणुन बाबासाहेबांनी मार्गदर्शक तत्वे निर्माण करून ठेवली आहे. बाबासाहेबांनी ही दूरदृष्टी या क्षेत्रामधील महत्वाची अशी दिशादर्शक कामगिरी आहे.

**राज्य घटनेच्या माध्यमातुन देशाला स्थैर्य :-**

भारताच्या शेजारच्या देशाचा अभ्यास केल्यास असे आढळुन येते की, पाकिस्तान,बांग्लादेश,म्यानमार,नेपाळ या देशामध्ये लोकशाही प्रस्थापित होऊ शकली नाही. या भारताच्या शेजारील देशामध्ये सतत राजकिय अस्थैर्य आहे.परंतू भारत देश राजकिय दृष्टया स्थिर आहे. एवढेच नाही तर संपुर्ण जगामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असलेला लोकशाही देश म्हणुन एक वेगळी प्रतिमा भारताची आहे. याला एकमेव कारण म्हणजे भारताची राज्यघटना होय. देशात शांतता व स्थैर्य असल्यामुळे देशाचा विकास होऊ शकला व आपला देश अस्थीर झाला नाही. भारतामध्ये काही विघटनवादी शक्तींनी भारताला अस्थीर करण्याचे अनेकदा प्रयत्न केले. देशाचे विभाजन करणाऱ्या खलिस्तान,गोरखलँड इत्यादी अनेक विघटनकारी घटना घडल्या परंतू राज्यघटनेनुसार देशाचे केंद्र सरकार सशक्त व स्थित असल्यामुळे या विघटनकारी घटनांचा वेळीच बिमोड करण्यात आला व देशाची राजकीय स्थीती स्थिर राहीली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यपुर्व कांलखडापासुनच भारताच्या भविष्यातील विविधांगी विकासाची पायाभरणी त्यांच्या कल्पक बुध्दीचातूर्याच्या बळावर निर्माण करुन ठेवली आहे. म्हणुन त्यांच्या कार्यामुळेच आज भारत इ.स. २०२० मधील जागतीक महाशक्ती म्हणून निश्चित जगामध्ये आपले स्थान निर्माण करेल.

**संदर्भग्रथ सुची :-**


१) लोकराज्य मासिक,एप्रील २०१६, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

3) डॉ. सुखदेव थोरात,डॉ. आंबेउकर नियोजन,जलविद्युत विकास विभाग,सुगाव प्रकाशन पुणे-३०